महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. :औसंवि/अ/कंका/ २६३५७ दिनांक : २७/०८/२०१४.

## परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबत.

संदर्भ : १) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३३१७, दि.०१/०२/२०१०.
२) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/२३८८०, दि.२३/०८/२०१२.
३) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/अ/६१४४, दि. २४/०२/२०१४

*********

क्षेत्रीय कार्यालयामार्फत कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता दिसून येत नाही. तसेच विविध ठिकाणी वेगवेगळे वेतन देण्यात येते. त्यामुळे संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये किमान वेतनाबाबत सविस्तर मार्गदर्शन व वरील संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये सुधारीत सुचना क्षेत्रीय कार्यालयांना करण्यात आलेल्या आहेत. तसेच वरील संदर्भ क्र. ०३ नुसार किमान वेतनासोबत द्यावयाच्या सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०१/२०१४ ते ३०/०६/२०१४ या कालावधीकरिता दिलेले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम - १९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेल्या अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१४-२/कार्या-१०, दि. ०६/०८/२०१४ अन्वये किमान वेतन अधिनियम - १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | २,२१४.०० | २,२१४.०० | २,२१४.०० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम - १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील. सदर सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीकरिता लागू आहेत.

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना दि. ०१/०७/२०१४ पासून लागू केलेल्या सुधारीत विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे ऑगस्ट २०१४ च्या वेतनामध्ये ठेकेदाराकडून अदा केल्याशिवाय ठेकेदाराची देयके अदा करु नये यांची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **RAPDRP- Infoportal** - (Circular-I.R.Dept.) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

किशोर पवार
(किशोर पवार)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत : प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत सर्वांना.

D:\archana\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc